Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 06 January 2026

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक ०६ जानेवारी २०२६ सकाळी ११.०० वाजता**

****

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय मंत्री सुरेश कलमाडी यांचं आज पुण्यात वृद्धापकाळाने निधन झालं, ते ८२ वर्षांचे होते. भारतीय हवाई दलात पायलट म्हणून आपल्या कारकिर्दीची सुरुवात करून कलमाडी यांनी पुणे शहराच्या राजकीय, सामाजिक, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रात ठसा उमटवला. मात्र २०१० मध्ये झालेल्या राष्ट्रकूल क्रिडा स्पर्धेच्या आयोजन समितीचे अध्यक्ष असताना भ्रष्टाचाराचे आरोप झाल्यानंतर त्यांच्या कारकिर्दीला मोठा धक्का बसला. एप्रिल २०२५ मध्ये सक्तवसुली संचालनालयाने याप्रकरणी सादर केलेल्या अहवालानंतर त्यांना क्लीन चिट मिळाली होती. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कलमाडी यांच्या निधनाबद्दल दु:ख व्यक्त करत त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

****

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आज पोषण सुरक्षा आणि कुपोषण निर्मूलन यात सीएसआर अर्थात कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटीची भूमिका, यासंदर्भातल्या राष्ट्रीय परिषदेचं उद्घाटन करणार आहेत. सहकारातून समृद्धी हा पंतप्रधानांचा संकल्प साकार करण्याच्या दृष्टीनं हे महत्वाचं पाऊल मानलं जात आहे. नवी दिल्लीतल्या विज्ञान भवनात हा कार्यक्रम होणार असून, एनडीडीबी अर्थात राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळ पोषण फाऊंडेशनद्वारे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

****

राज्यात महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचाराचा जोर वाढत आहे. मुख्यमंत्री आणि भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांनी काल परभणी, नांदेड आणि पुण्यात जाहीर सभा घेतल्या. उपमुख्यमंत्री आणि शिवसेनेचे नेते एकनाथ शिंदे यांनी काल ठाण्यात रोड शो केला. सोलापूरमध्ये काल झालेल्या भाजपाच्या कार्यकर्ता मेळाव्यामध्ये प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी संवाद साधला.

मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि मनसे प्रमुख राज ठाकरे मुंबईत पक्ष शाखांना भेट देत आहेत. याशिवाय दादरमध्ये शिवाजी पार्क, ठाणे, कल्याण-डोंबिवली आणि नाशिकमध्ये त्यांच्या संयुक्त प्रचारसभा होणार आहेत.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या वर्षी पार पडलेल्या वेव्ज परिषदेत संगीत आणि कला क्षेत्रातल्या अनेक नवीन आंतरराष्ट्रीय प्रकल्पांची बीजं रोवली गेली होती, त्याचा परिणाम म्हणून संगीत क्षेत्रातला जागतिक पातळीवरचा पहिला करार मुंबईत होत असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. युनिव्हर्सल म्युझिक ग्रुप आणि एक्सेल एंटरटेनमेंट यांच्यामध्ये काल मुंबईत धोरणात्मक भागीदारी कराराची घोषणा करण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. हा संगीत क्षेत्रातला जागतिक पातळीवरचा पहिला करार असून, कलाक्षेत्रात आपला ठसा उमटवण्याची इच्छा असलेल्या जगभरातल्या सर्व निर्मात्यांचं महाराष्ट्रात आणि मुंबईत स्वागत असल्याचं फडणवीस यावेळी म्हणाले.

****

दिव्यांग व्यक्तींना दिले जाणारे वैश्विक दिव्यांग ओळखपत्र जारी करण्यापूर्वी वैद्यकीय तपासणी अहवालांची पडताळणी संबंधित संस्थेमार्फत करणं आवश्यक असल्याचं दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी सांगितलं. चुकीचे किंवा बनावट दिव्यांगत्व प्रमाणपत्र घेणं अथवा देणं हा कायद्याने गुन्हा असून, अशा प्रकरणांमध्ये संबंधित व्यक्तींवर कडक कारवाई करण्यात येणार असल्याचंही त्यांनी सांगितलं.

****

राज्यभर प्रतिबंधित पदार्थांच्या उत्पादनाविरोधात अन्न आणि औषध प्रशासन विभागाकडून मोठ्या प्रमाणात कारवाई केली जात आहे. अन्न आणि औषध प्रशासनाने दोन जानेवारी रोजी सुमारे ३१ कोटी रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. या विभागाचे मंत्री नरहरी झिरवाळ यांनी राज्यात प्रतिबंधित पदार्थांवर कठोर कारवाईचे आदेश दिले असून, त्याची काटेकोर अंमलबजावणीसाठी आढावा घेतला. पुणे जिल्ह्यात मावळ तालुक्यातल्या टाकवे इथल्या सोएक्स इंडिया प्रा. लि.` कंपनीचे संचालक आणि व्यवस्थापक यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

****

बीड शहरात तारांगण आणि विज्ञान केंद्र उभारण्याला प्रशासकीय मान्यता मिळाल्याची माहिती आमदार विजयसिंह पंडित यांनी दिली. विज्ञान केंद्रांमध्ये चार माहिती केंद्र असतील तर तारांगणामधे विविध ग्रह, तारे, उल्का, आकाशगंगा आदींची माहिती दिली जाणार आहे. २८ कोटी रुपये खर्चाचं हे तारांगण आणि विज्ञान केंद्र उभारण्याची घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली होती.

****

दीवमध्ये कालपासून दुसऱ्या पर्वातील खेलो इंडिया बीच स्पर्धा सुरू झाल्या आहेत. कालचा उद्घाटनाचा दिवस महाराष्ट्राच्या कबड्डी संघाच्याच कामगिरीने गाजला. महिलांनी सलामीच्या लढतीत यजमान दीव-दमण संघाचा ५३ गुणांनी पराभव केला. पाठोपाठ पुरूष संघानेही दिल्लीला ४७–२० गुणांनी पराभूत करत विजयी सलामी दिली. स्पर्धेत महाराष्ट्राचं ७७ जणांचं पथक सहभागी झालं आहे.

****

लातूर इथं सहावीतल्या विद्यार्थिनीचा वसतिगृहात संशयास्पद मृत्यू झाल्याच्या घटनेच्या निषेधार्थ नातेवाईकांनी काल रास्ता रोको आंदोलन केलं. या विद्यार्थिनीचा मृतदेह वसतिगृहातल्या पलंगाला लटकलेल्या अवस्थेत परवा आढळून आला होता. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

****

बुलडाणा जिल्ह्यात ढाल सावंगी गावाजवळ बसची दुचाकीला धडक लागून तीन जण ठार झाले. काल दुपारी ही दुर्घटना घडली. ही बस छत्रपती संभाजीनगरहून मलकापूर कडे जात असताना समोरून येणाऱ्या दुचाकीला जोरदार धडक लागल्यामुळे हा अपघात झाल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****